


सर्व वाचक, जाहिरातदार हितचिंतक यांना
श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीकाला उत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा

महाराष्ट्र शासनाच्या यादीवरील अंक...
साप्ताहिक RNI : MAH/MAR/2011/40762 पोस्टल नंबर : MCW/354/2021-23

# धगधगती मुंबई

website:www.dhagdhagtimumbai.in E-mail : dhagdhagtimumbai@gmail.com

वर्ष : १६ अंक : २९, संपादक - भिमराव हिंदुराव धुळप, मंगळवार, दिनांक १ सप्टेंबर २०२६ ते ७ सप्टेंबर २०२६ पाने : ४ मूल्य : २ रुपये

## सुट्ट्या खाद्यतेलाच्या विक्रीवरील बंदीचा गरिबांच्या रोजच्या स्वयंपाकावर परिणाम; उपाययोजना करण्याची मागणी



मुंबई(भीमराव धुळप) : राज्यात सुट्ट्या खाद्यतेलाच्या विक्रीवर बंदी घालण्यात आल्याने त्याचा सर्वाधिक फटका रोजंदारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या अत्यंत गरीब कुटुंबांना बसण्याची शक्यता आहे. दररोजच्या कमाईतून संध्याकाळी गरजेपुरते अर्धा लिटर, पाव लिटर किंवा अगदी १०-१५ रुपयांचे तेल घेऊन एक दिवसाचा स्वयंपाक करणाऱ्या कुटुंबांसमोर आता मोठी अडचण निर्माण झाली आहे.

ग्रामीण भागासह शहरी भागातील अनेक गरीब कुटुंबांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. काही कुटुंबांमध्ये कुटुंबप्रमुख रोजंदारीवर काम करून उदरनिर्वाह करतात, तर अनेक महिला घरकाम, छोटे-मोठे व्यवसाय किंवा मजुरी करून घर चालवतात. काही अतिशय गरजू नागरिक तर दिवसाची कमाई झाल्यानंतरच त्या दिवसाच्या जेवणाची व्यवस्था करतात.

अशा कुटुंबांसाठी मोठ्या प्रमाणात खाद्यतेल खरेदी करणे शक्य नसते. त्यामुळे ते आपल्या आर्थिक क्षमतेनुसार थोडे-थोडे तेल खरेदी करून भाजी, आमटी अथवा अन्य पदार्थ तयार करतात. मात्र सुट्टे तेल उपलब्ध नसल्यामुळे दैनंदिन स्वयंपाक करताना त्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सरकारने खाद्यतेलाच्या विक्रीतील गैरप्रकार रोखण्यासाठी निर्णय घेतला असला, तरी त्याची अंमलबजावणी करताना अत्यंत गरीब आणि रोजच्या कमाईवर अवलंबून असलेल्या नागरिकांचा विचार होणे आवश्यक आहे. मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करण्याची क्षमता नसलेल्या कुटुंबांसाठी परवडणाऱ्या प्रमाणात खाद्यतेल उपलब्ध करून देण्याची पर्यायी व्यवस्था सरकारने करावी, अशी मागणी होत आहे.

'ज्यांच्याकडे आजच्या जेवणापुरते पैसे असतात, ते उद्यासाठी तेल कसे खरेदी करणार?' असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. त्यामुळे शासनाने या निर्णयाचा गरीब आणि रोजंदारीवर जगणाऱ्या कुटुंबांवर होणारा परिणाम लक्षात घेऊन तातडीने उपयोजना कराव्यात आणि गरजू नागरिकांना स्वस्त दरात आवश्यक प्रमाणात खाद्यतेल उपलब्ध करून द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## धारावी पुनर्विकासाचा मास्टर प्लॅन लवकरच जाहीर होणार

मुंबई : धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या सविस्तर मास्टर प्लॅनकडे रहिवाशांचे लक्ष लागले असून, हा आराखडा लवकरच सार्वजनिक होण्याची शक्यता आहे. या आराखड्यात रहिवाशांना देण्यात येणाऱ्या घरांचे स्वरूप, आकारमान तसेच पुनर्वसनाची जागा याबाबत स्पष्टता येणार आहे.

दरम्यान, स्थानिक रहिवाशांनी पुनर्विकासाचा संपूर्ण मास्टर प्लॅन सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे. तसेच प्रत्येक पात्र गाळेधारकाला त्याच्या गाळ्याच्या बदल्यात नव्या प्रकल्पात गाळा देण्याची 'की-टू-की' पुनर्वसनाची लिखित हमी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागण्या मान्य होईपर्यंत अदानी समूहासोबतचा करार पुढे नेऊ नये, असा इशाराही स्थानिकांकडून देण्यात आला आहे.

प्रस्तावित आराखड्यानुसार धारावीत तळघरात पार्किंग, तळमजल्यावर दुकाने, पोडियम स्तरावर लघुउद्योग आणि त्यावरील मजल्यांवर निवासी इमारती उभारण्याची शक्यता आहे. त्यामुळे मास्टर प्लॅन जाहीर झाल्यानंतर धारावीकरांच्या पुनर्वसनाबाबतची प्रत्यक्ष रूपरेषा अधिक स्पष्ट होणार आहे.

## गणेश मंडळांनी प्रसादाची शुद्धता जपावी; नियमांचे काटेकोर पालन करा - मुख्यमंत्री

मुंबई : राज्य उत्सवाचा दर्जा प्राप्त झालेला गणेशोत्सव उत्साह, शिस्त आणि पावित्र्यपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन आणि गणेशोत्सव मंडळांनी समन्वयाने काम करावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. गणेश मंडळांनी भाविकांना देण्यात येणाऱ्या प्रसादाची शुद्धता आणि गुणवत्ता जपावी तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

गणेशोत्सव-२०२६च्या कायदा व सुव्यवस्थेबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध सूचना केल्या. प्रसाद भेसळमुक्त आणि सुरक्षित राहण्यासाठी मंडळांनी आवश्यक प्रशिक्षण व मार्गदर्शन घ्यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गणेशमूर्तींच्या आगमन व विसर्जन मार्गावर खड्डे राहू नयेत, पुरेशी प्रकाशव्यवस्था असावी आणि मंडळांच्या परवानग्यांचे प्रश्न तातडीने सोडवावेत, अशा सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. फटाके व लाऊडस्पीकरच्या वापरातील नियमभंगावर पोलिसांनी कठोर कारवाई करावी, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. मोठ्या मूर्तींच्या वाहतुकीवेळी सुरक्षिततेची विशेष काळजी घ्यावी तसेच सोशल मीडियावरील अफवांपासून मंडळांनी सतर्क राहावे, असे त्यांनी सांगितले.

## घोगाव जिल्हा परिषद शाळेतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा 'धगधगती मुंबई'तर्फे सन्मान




घोगाव : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, घोगाव येथील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उज्वल यश संपादन करून राज्य पातळीवर आपल्या गावाचे आणि शाळेचे नाव उंचावल्याबद्दल त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. 'धगधगती मुंबई' वृत्तपत्र परिवार आणि संत रोहिदास मित्र मंडळ, घोगाव यांच्या संयुक्त विद्यमाने हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.

या विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरावर पोहोचविण्यासाठी विशेष मार्गदर्शन करणाऱ्या सौ. सविता सचिन राजमाने मॅडम यांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. माजी प्राचार्य वसंत धुळपसर आणि 'धगधगती मुंबई'चे संपादक भीमराव धुळप यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक अनंत भंडारे, शिक्षक बाजीराव शेटे, दत्तात्रय कुंभार, राहुल पावले, तसेच घोगावचे प्रतिष्ठित नागरिक शंकर पाटील आबा, उपसरपंच निवास शेवाळे, नारायण साळुंखे, बाजीराव तांबेकर, पोलीस पाटील शिवाजी भावके, जगताप सर, संत रोहिदास मित्र मंडळाचे अध्यक्ष सुभाष गोविंद धुळप, विकास साळुंखे, ग्रामस्थ, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना संपादक भीमराव धुळप म्हणाले, "जुन्या आठवणींना उजाळा देताना आपल्या पाठीवर कोणीतरी कौतुकाची थाप द्यावी, ही भावना आम्हीही शाळेत असताना अनुभवली आहे. आज याच शाळेतील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्यासाठी खास मुंबईहून घोगाव येथे येऊन त्यांचा सन्मान करता आला, याचा मनस्वी आनंद आणि समाधान आहे."

या उपक्रमांतर्गत सौ. महानंदा वसंत धुळप यांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांना उत्कृष्ट कंपनीचे कंपास भेट देण्यात आले. तसेच 'धगधगती मुंबई' वृत्तपत्र परिवाराच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानपत्र आणि कायमस्वरूपी आठवणीत राहील अशी टेबल पेन-घड्याळाची भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करत त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाचे ग्रामस्थ, शिक्षक आणि पालकांनी स्वागत केले.

## दादरमध्ये 'एक हंडी दिव्यांगांसाठी'; ४ सप्टेंबरला विशेष दहीकाला उत्सव

### शिवसेना माहीम विधानसभा आणि धगधगती मुंबई परिवाराचा सामाजिक उपक्रम; दिव्यांग विद्यार्थिनींचा होणार सन्मान

मुंबई : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) माहीम विधानसभा यांच्या वतीने आणि धगधगती मुंबई परिवाराच्या सहकार्याने यंदाच्या दहीकाला उत्सवानिमित्त 'एक हंडी दिव्यांगांसाठी' हा विशेष सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजता कमला मेहता अंध मुलींची शाळा, दादर पूर्व येथे हा विशेष कार्यक्रम होणार आहे.

दहीकाला उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा उपक्रम यंदाही राबविण्यात येत असून, दिव्यांग विद्यार्थिनींना दहीकाला उत्सवाचा आनंद घेता यावा आणि त्यांच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने त्यांच्या शाळेतच 'एक हंडी दिव्यांगांसाठी' हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात दिव्यांग विद्यार्थिनींचा विशेष सन्मान करण्यात येणार असून, त्यांना सन्मानचिन्ह व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. दिव्यांग बांधवांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, याची विशेष काळजी घेऊन हा उपक्रम शाळेच्या परिसरात आयोजित करण्यात आला आहे.

धगधगती मुंबई परिवाराच्या वतीने दरवर्षी दहीकाला उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येतात. अनाथाश्रम, वृद्धाश्रम, कॅन्सरग्रस्त रुग्णांना मदत तसेच रुग्णांच्या नातेवाईकांना अन्नदान यांसारखे विविध सामाजिक उपक्रम यापूर्वी राबविण्यात आले आहेत. याच सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून यंदा दिव्यांग विद्यार्थिनींसाठी विशेष दहीकाला उपक्रम राबविण्यात येत आहे.

दरम्यान, शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत केशव दाते उद्यान, डॉ. आगाशे पथ, भवानी शंकर रोड, दादर पश्चिम येथे मुख्य दहीकाला उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात सहभागी होणाऱ्या गोविंदा पथकांसाठी रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि विविध बक्षिसे देण्यात येणार असून, एकूण २ लाख ५१ हजार रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत.या कार्यक्रमाचे आयोजक श्री. यशवंत विचले, माहीम विधानसभा निरीक्षक (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) तसेच

धगधगती मुंबई परिवाराचे पत्रकार श्री. भीमराव बाळकाबाई हिंदुराव धुळप हे आहेत.

'एक हंडी दिव्यांगांसाठी' या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचा संदेश देतानाच दिव्यांग विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.



# संपादकीय

## स्पर्धेपेक्षा श्रद्धा महत्त्वाची !

मुंबईतील गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नाही, तर तो श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक एकजुटीचा उत्सव आहे. मात्र गेल्या काही वर्षांत या उत्सवाचे स्वरूप बदलताना दिसत आहे. गणेशमूर्तींची उंची, भव्य देखावे, आकर्षक विद्युत रोषणाई, मिरवणुका आणि प्रसिद्धी यामध्ये सुरू झालेली स्पर्धा आता श्रद्धेपेक्षा दिखाव्याला अधिक महत्त्व देऊ लागली आहे. भुलेश्वर येथे गणेशमूर्तीच्या आगमनावेळी घडलेल्या दुर्घटनेने या प्रश्नाकडे पुन्हा एकदा गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करण्यामागे समाजाला एकत्र आणणे, जनजागृती करणे आणि राष्ट्रीय भावना जागृत करणे हा व्यापक उद्देश ठेवला होता. काही दशकांपर्यंत हा हेतू मोठ्या प्रमाणात जपला गेला. मात्र पुढे गणेशमूर्तींच्या उंचीची आणि देखाव्यांच्या भव्यतेची स्पर्धा वाढत गेली. 'आपला गणपती सर्वांत मोठा', 'आपला देखावा सर्वांत आकर्षक' आणि 'सर्वाधिक गर्दी आपल्या मंडळाकडे' या मानसिकतेने उत्सवाचे स्वरूप बदलले.

आज २०-२५ फुटांपेक्षा अधिक उंचीच्या मूर्ती अनेक मंडळांकडून आणल्या जातात. या मूर्तींची निर्मिती, वाहतूक, उभारणी आणि विसर्जन या प्रत्येक टप्प्यावर मोठ्या प्रमाणात तांत्रिक जोखीम असते. लोखंडी सांगाडे, वेल्डिंग, आधाररचना आणि गर्दीचे नियोजन यातील एखादी छोटी चूकही जीवघेणी ठरू शकते. भुलेश्वर दुर्घटनेत दोन जणांचा मृत्यू आणि काही जण जखमी झाल्याने ही बाब केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक गणेश मंडळाने आत्मपरीक्षण करण्याची गरज अधोरेखित करते.

गणेशोत्सवात भक्तांसाठी दर्शन हा केंद्रबिंदू असायला हवा. मात्र नवसाची रांग, सामान्य भाविकांची रांग, सशुल्क दर्शन आणि व्हीआयपी दर्शन अशा व्यवस्थांमुळे समानतेच्या भावनेलाच तडा जातो. त्यातच मूर्तीचे पाटपूजन, मुखदर्शन, फोटोसेशन आणि मोठ्या प्रमाणावरील प्रसिद्धी यामुळे श्रद्धेचे रूप हळूहळू प्रदर्शनात बदलत आहे.

उत्सवाच्या निमित्ताने कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल होते, जाहिरातींचा मोठा बाजार निर्माण होतो आणि राजकीय तसेच व्यावसायिक हितसंबंधही त्यात सहभागी होतात. उत्सवाला आर्थिक पाठबळ मिळणे चुकीचे नाही; परंतु त्यातून श्रद्धेपेक्षा प्रतिष्ठा, प्रसिद्धी आणि प्रभावाची स्पर्धा वाढत असेल तर त्याचा पुनर्विचार आवश्यक आहे.

गणेशोत्सव किती मोठा आहे, यापेक्षा तो किती अर्थपूर्ण आहे, हे महत्त्वाचे. गणरायाच्या मूर्तीची उंची वाढविण्यापेक्षा समाजातील माणुसकीची उंची वाढविणे अधिक गरजेचे आहे. भव्यतेच्या स्पर्धेपेक्षा भक्ती, सुरक्षितता, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणपूरकता यांना प्राधान्य मिळाले पाहिजे.

गणपती बाप्पा मोरया! पण बाप्पाच्या नावावर जीव धोक्यात घालण्याची वेळ पुन्हा येऊ नये. स्पर्धेपेक्षा श्रद्धा मोठी आणि दिखाव्यापेक्षा सुरक्षितता महत्त्वाची...

हीच यंदाच्या गणेशोत्सवाची खरी शिकवण ठरावी.

## नागरी संरक्षण दलाच्या पाच दिवसीय प्रशिक्षण शिबिराचा कोपरखैरणेत समारोप

नवी मुंबई : कोपरखैरणे येथील एफ. जी. नाईक महाविद्यालयात नागरी संरक्षण दलाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय प्रशिक्षण शिबिराचा शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी उत्साहात समारोप झाला. ठाणे जिल्हा उपनियंत्रक विजयजी जाधव यांच्या आदेशान्वये सोमवार, दि. २४ ऑगस्टपासून या प्रशिक्षण शिबिरास सुरुवात करण्यात आली होती.

ठाणे जिल्हा उपनियंत्रक विजयजी जाधव यांच्या आदेशान्वये तसेच सहाय्यक नियंत्रक अनिलजी गावित यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण पार पडले. प्रशिक्षणादरम्यान मानवी जीवनावर उद्भवणाऱ्या नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तींच्या काळात स्वतःचा बचाव करण्यासोबतच इतरांचे प्राण वाचविण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात, आपत्कालीन परिस्थितीत कशा पद्धतीने मदतकार्य करावे, याबाबत प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षणासाठी गेस्ट लेक्चरर म्हणून डॉ. राहुल घाटवाळ तसेच प्रकाश ठमके यांनी उपस्थित राहून प्रशिक्षणार्थींना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. आपत्तीच्या प्रसंगी तत्काळ निर्णय घेणे, बचावकार्याची प्राथमिक माहिती, सुरक्षितता उपाययोजना आणि नागरिकांनी बजावायची भूमिका याबाबत प्रात्यक्षिकांसह माहिती देण्यात आली.

प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवसापासून समारोपाच्या दिवसापर्यंत विभागीय क्षेत्ररक्षक अरुण सातपुते आणि स्वयंसेवक रमेश संकपाळ यांनी नियोजनबद्ध पद्धतीने संपूर्ण प्रशिक्षण शिबिराचे कामकाज पाहिले.

नवी मुंबई परिसरातील ७० प्रशिक्षणार्थींनी या पाच दिवसीय प्रशिक्षण शिबिराचा लाभ घेतला. आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने नागरिकांमध्ये जागरूकता, स्वयंरक्षणाची क्षमता आणि संकटसमयी इतरांना मदत करण्याची मानसिकता निर्माण करण्यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरले.

## बँगलोर येथील "निखिल प्रॉडक्ट्स" चे रातराणी (नाईट क्वीन) आणि फिरदौस धूप बाजारात !

मुंबई : निखिल प्रॉडक्ट्स बैंगलोरच्या कंपनीने येणाऱ्या सण उत्सवासाठी श्रावण, गणपती, दसरा, दिवाळी या सणांचे औचित्य साधून रातराणी (नाईट क्वीन) आणि फिरदौस धूप बाजारामध्ये उपलब्ध केले आहेत. पूजा किंवा धार्मिक विधीमध्ये धूपाला विशेष महत्त्व दिले गेले आहे. असे मानले जाते की देवाची पूजा करत असताना आपले मन संपूर्णपणे प्रार्थनेत विलिन व्हावे, यासाठी धूपाच्या मनमोहक सुवासाची मदत होते. रातराणी (नाईट क्वीन) आणि फिरदौस धूप हे धूप उच्च दर्जाच्या नैसर्गिक सुगंधी द्रव्यापासून तयार केले असून, १८ कांड्यांच्या पॅकिंगमध्ये आणि MRP १०५/- सह बाजारात उपलब्ध आहेत. हे दोन्ही धूप मुंबई, ठाणे, कोकण, पुणे, कोल्हापूर, नाशिक, बीड सह संपूर्ण महाराष्ट्रात उपलब्ध आहेत.

**निखिल प्रॉडक्ट्स च्या उत्पादनांचे मुंबईचे प्रमुख विक्रेते आचार्य प्रॉडक्टस् यांच्या शाखा :** (१) शॉप नं.५-८, संगीत सागर, एल. एन. लेन, माटुंगा (पु.), मुंबई-१९. (संपर्क ८६५५७६६७७८) शॉप नं.३, श्रीपती आराधना टॉवर, राममंदिरच्या पुढे, भुलेश्वर, मुंबई-२. (संपर्क ९७६९०७८३६५) (२) (३) शॉप नं.१९-ए, नटराज मार्केट, स्टेशन रोड, मालाड (प.), मुंबई-६४. (संपर्क ७५०६८१६२७२) (४) शॉप ३-४ हॉटेल प्रिन्स, अशोक टॉकीज शेजारी, स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम) -४००६०१. (संपर्क ९९६७६५८७६८) (५) शॉप नं.१, मर्चेंट सेंटर, ए.पी.एम.सी. मार्केट, सेक्टर १९, वाशी-४००७०३. (संपर्क ८८७९३७४५९२) यांच्याशी संपर्क साधावा.

## अनाथ बालकांसोबत लावणी कलावंत महासंघाचा भावपूर्ण रक्षा बंधन सोहळा

मानखुर्द : लावणी कलावंत महासंघाच्या वतीने आणि श्री श्री बालाजी फाउंडेशनच्या सहकार्याने मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी मानखुर्द येथील चेंबूर चिल्ड्रन होममधील अनाथ बालकांसोबत आगळ्यावेगळ्या पद्धतीने रक्षा बंधन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

बालरंगभूमीच्या अध्यक्षा निलमताई शिर्के-सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी महासंघाच्या हितचिंतक चारुशीलाताई गोलम, शिवाजी शिंदे, चिल्ड्रन होमचे अधिकारी, लावणी कलावंत महासंघाचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात मुलांच्या मनोरंजनासाठी जादूचे प्रयोग, कराओके ऑर्केस्ट्रा तसेच डी.जे. डान्सचे आयोजन करण्यात आले होते. यामुळे चिल्ड्रन होममधील मुलांनी मनसोक्त आनंद लुटला.




यावेळी मुलांना शालेय साहित्य, जीवनावश्यक वस्तू, सुका खाऊ, बिस्कीट, ज्यूस, पादत्राणे तसेच विविध भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. रक्षा बंधनाचे औचित्य साधून महिला कलाकारांनी चिल्ड्रन होममधील मुलांना, तर मुलींनी पुरुष कलाकारांना राखी बांधून स्नेह आणि आपुलकीचा संदेश दिला.

या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपत अनाथ बालकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि आनंद पाहून उपस्थित कलाकार व मान्यवरही भावूक झाले. 'सणाचा खरा आनंद तो इतरांसोबत वाटण्यात आहे', हा संदेश या सामाजिक उपक्रमातून देण्यात आला.

## नेरूळची लेक बनली जुनागडची सहाय्यक जिल्हाधिकारी; आयएएस वृषाली कांबळे मंगळवारपासून कर्तव्यावर

मुंबई(जमीर काझी) : प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर भारतीय प्रशासकीय सेवेत (आयएएस) स्थान मिळविणाऱ्या नवी मुंबईतील नेरूळच्या वृषाली कांबळे यांची गुजरातमधील जुनागड जिल्ह्यात सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रांत अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. येत्या मंगळवार, १ सप्टेंबरपासून त्या आपल्या पदाची सूत्रे स्वीकारणार आहेत.



मूळच्या कोल्हापूर जिल्ह्यातील उत्तूर (ता. आजरा) येथील कांबळे कुटुंबीय गेल्या अनेक वर्षांपासून नेरूळ सेक्टर-२० येथे वास्तव्यास आहेत. वृषाली यांनी सेंट ऑगस्टीन स्कूलमधून दहावी, एसआयईएस कॉलेजमधून बारावी, तर सेंट झेवियर्स कॉलेजमधून राज्यशास्त्र विषयात पदवी घेतली. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांनी यूपीएससीची तयारी सुरू केली.

पहिल्या प्रयत्नात थोडक्यात अपयश आल्यानंतर त्यांनी 'बार्टी'मध्ये प्रवेश घेत पुन्हा जोमाने तयारी केली. दिल्ली आणि पुणे येथे दररोज सुमारे ११ ते १२ तास अभ्यास करत त्यांनी यूपीएससी २०२४ परीक्षेत देशात ३१०वा क्रमांक मिळविला. प्रशिक्षण व परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर गुजरात केडर मिळालेल्या वृषाली यांच्यावर आता जुनागडच्या प्रशासकीय जबाबदारीची धुरा सोपविण्यात आली आहे.

"उद्दिष्ट गाठण्यासाठी स्वतःला झोकून द्या," असा संदेश देणाऱ्या वृषाली या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित आहेत. सामान्य जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रशासकीय अधिकारांचा प्रभावी वापर करण्याचा त्यांचा मानस आहे. त्यांच्या यशामुळे मध्यमवर्गीय आणि बहुजन समाजातील विद्यार्थी-युवकांसाठी त्या प्रेरणास्थान ठरल्या आहेत.



## घोंगावच्या मोहनराव नायकवडी यांना 'लोकमत एक्सलन्स अवॉर्ड 2026'




सातारा : घोंगाव, ता. कराड येथील सुपुत्र तथा नवी मुंबईतील सामाजिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे श्री. मोहनराव नायकवडी यांना दैनिक लोकमत प्रस्तुत 'लोकमत एक्सलन्स अवॉर्ड २०२६' ने सन्मानित करण्यात आले. सातारा येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या शुभहस्ते नायकवडी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अत्यंत ग्रामीण भागातून पुढे येत नवी मुंबईत स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करणाऱ्या नायकवडी यांनी कराड ग्रामीण क्रिकेट असोसिएशन रजि., नवी मुंबईची स्थापना केली. मुंबईसह महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील नवोदित क्रिकेटपटूंना एकत्र आणून विविध भव्य क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करत त्यांनी हजारो खेळाडूंना आपल्या क्रीडा कौशल्याला वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत लोकमत समूहाने त्यांचा गौरव केला.

या सोहळ्यास आ. मनोज घोरपडे, जिल्हा परिषद अध्यक्षा डॉ. प्रियाताई शिंदे, नितीन बानुगडे-पाटील, लोकमतचे संपादक सचिन जवळकोटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

नायकवडी यांच्या या सन्मानाबद्दल घोंगावसह कराड तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मैत्रीच्या सुगंधाने रंगला 'मैत्री एक मिनरल वॉटर' पुस्तक प्रकाशन सोहळा




पनवेल : लेखक डॉ. गोरखनाथ पोळ यांच्या 'मैत्री एक मिनरल वॉटर' या पाचव्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा कामोठे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विशेष म्हणजे डॉ. पोळ यांच्या ५१ व्या वाढदिवसाचे औचित्य साधल्याने साहित्य, मैत्री, कविता, सन्मान आणि आपुलकीचा अनोखा संगम या सोहळ्यात पाहायला मिळाला.

कार्यक्रमास सुप्रसिद्ध वक्ते रवींद्र पाटील, केतकी प्रकाशनचे संचालक चंद्रकांत जाधव, गायत्री एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापिका लता पवार, डॉ. मंदार पनेलकर, डॉ. अनंता धरणेकर, उद्योजक राकेश गुप्ता, एस.व्ही.एन. स्कूलचे चेअरमन रमेश संकपाळ, जीवनदीप प्रकाशनचे विकी अग्रवाल, डीपीएम टेकचे संचालक दिलीप गुप्ता यांच्यासह शिक्षण, साहित्य, उद्योग व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे निवेदक नारायण लांडगे पाटील यांनी पुस्तकाची संकल्पना उलगडताना, हे पुस्तक केवळ मैत्रीवर आधारित नसून डॉ. पोळ यांच्या जीवनप्रवासाची आणि 'झिरो टू हिरो' यशोगाथेची प्रेरणादायी कहाणी असल्याचे सांगितले.

यावेळी कविता डॉट कॉमच्या कवी-कवयित्रींनी मैत्रीच्या विविध पैलूंवर आधारित कविता सादर करून वातावरण रंगवले. प्रसिद्ध कवी अनंत राऊत यांच्या कवितेने काव्यमैफलीची सुरुवात झाली.

'सखा पांडुरंग' उपक्रमांतर्गत अभंग गायन स्पर्धेतील पाच विजेत्या विद्यार्थ्यांचा विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्ती देऊन विशेष सन्मान करण्यात आला. विविध मान्यवरांनी डॉ. पोळ यांना पुस्तक प्रकाशन व वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. रमेश संकपाळ यांनी आभार मानले.

एकंदरीत, हा सोहळा मैत्री, साहित्य आणि सामाजिक बांधिलकीचा संस्मरणीय उत्सव ठरला.

## महत्त्वाच्या घडामोडी.....

### मुंबईत रिक्षा-टॅक्सी भाडेवाढ

आजपासून नवे दर लागू मुंबई महानगर प्रदेशातील प्रवाशांना १ सप्टेंबरपासून रिक्षा-टॅक्सी प्रवासासाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत.

### वांद्र्यात ८ वर्षांच्या मुलाचा कारच्या धडकेत मृत्यू; महिला चालकाला अटक

रस्ता ओलांडणाऱ्या अंश या आठ वर्षांच्या मुलाला भरधाव कारने धडक दिल्याने मृत्यू झाला. या घटनेने मुंबईतील रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### मुंबई विमानतळाच्या व्यवस्थेत मोठा बदल.. आंतरराष्ट्रीय विमानसेवांवर परिणामाची शक्यता

ऑक्टोबरपासून मुंबईच्या विमानतळ नेटवर्कमध्ये मोठे ऑपरेशनल बदल होणार असून आंतरराष्ट्रीय विमानसेवांचे वितरण बदलण्याची शक्यता आहे.

### मुंबईत गणेशोत्सवासाठी ३५५ कृत्रिम विसर्जन तलाव; 'गुगल मॅप'वर माहिती

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेने सुमारे ३५५ कृत्रिम तलावांची व्यवस्था केली असून नागरिकांना जवळचे विसर्जनस्थळ शोधण्यासाठी गुगल मॅपवर माहिती उपलब्ध करून दिली आहे.

### मुंबई महापालिकेत महायुतीत अंतर्गत मतभेद ?

महापालिकेच्या सुधार समितीच्या कामकाजात पुरेशी संधी मिळत नसल्याचा आरोप भाजप नगरसेवकांनी केला आहे. त्यामुळे महापालिकेतील भाजप-शिवसेना संबंधांवर चर्चा सुरू झाली आहे.

### मुंबई विमानतळावर ₹११ कोटींचे ७ किलो सोने जप्त

डीआरआयने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर मोठी कारवाई करत सुमारे ₹११ कोटी किमतीचे सात किलो सोने जप्त केले. सहा जणांना अटक करण्यात आली आहे.

## धगधगती मुंबईच्या बातमीचा इम्पॅक्ट !

### उंडाळे–तुळसण रोडवरील अतिक्रमण निष्कासनास प्रशासनाची सुरुवात

कराड (प्रताप भणगे) : उंडाळे तुळसण रोडवरील उंडाळे हद्दीत असलेल्या अतिक्रमणाबाबत 'धगधगती मुंबई' ने वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. सदर DDM न्यूज पोर्टल वरील बातमीची दखल घेऊन अखेर प्रशासनाने अतिक्रमण निष्कासनाच्या कारवाईला सुरुवात केली आहे.

रस्त्यालगत झालेल्या अतिक्रमणामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब यापूर्वी निदर्शनास आणून देण्यात आली होती. त्यानंतर प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून अतिक्रमण हटविण्याच्या कार्यवाहीस सुरुवात केली आहे.



अतिक्रमण हटविल्यामुळे रस्ता मोकळा होऊन वाहतुकीला मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. मात्र, ही कारवाई केवळ उंडाळे हद्दीपुरती न राहता उंडाळे–तुळसण रोडवरील सर्व अतिक्रमणांवर सातत्याने करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

'धगधगती मुंबई'च्या वृत्तामुळे प्रशासनाने घेतलेल्या या दखलीबद्दल नागरिकांकडून समाधान व्यक्त होत असून, पुढील काळातही प्रशासनाने सार्वजनिक रस्ते अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## दहा वर्षे सेवा, तरीही मागण्या प्रलंबित

### १,६७५ कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांचे आझाद मैदानात आंदोलन

मुंबई : बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागात राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत गेल्या दहा वर्षांपासून सेवा बजावणाऱ्या १,६७५ कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आझाद मैदानात आंदोलन केले. डी.एस. इंटरप्रायजेस या कंपनीमार्फत डॉक्टर, नर्स, फार्मसी, लॅब टेक्निशियन, डेटा एन्ट्री ऑपरेटर आणि अटेंडंट या पदांवर हे कर्मचारी कार्यरत आहेत.

गेल्या दशकभरापासून आरोग्य विभागात महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असूनही त्यांच्या मूलभूत मागण्यांकडे अद्याप गांभीर्याने पाहिले गेले नसल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला. त्यामुळे शासन व महापालिका प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

आंदोलनादरम्यान दीपक चव्हाण, प्रतीक्षा भागवत, प्रवीण चव्हाण, गिरीश सुर्वे, रेश्मा कोचले, परेश मटकर, प्रणाली जठार, माया केदार, हिरामण बनगारे यांच्यासह महिला व पुरुष कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांची माहिती दिली.

कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये वार्षिक वेतनवाढ लागू करणे, भरपगारी प्रसूती रजा देणे, सानुग्रह अनुदान अर्थात दिवाळी बोनस देणे, भविष्य निर्वाह निधी (पीएफ) व कर्मचारी राज्य विमा योजना (ईएसआयसी) लागू करणे तसेच वार्षिक सुट्ट्या देणे यांचा समावेश आहे.

याशिवाय ठेकेदारी पद्धत रद्द करून कर्मचाऱ्यांचा शासकीय सेवेत समावेश करावा, 'स्पर्श' प्रणालीच्या माध्यमातून वेतन अदा करावे, बाह्यस्रोत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी स्वतंत्र विधेयक सभागृहात मांडावे आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करावी, अशा मागण्याही आंदोलनकर्त्यांनी केल्या.

दहा वर्षांपासून आरोग्य विभागात सेवा देणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा शासन व महापालिका प्रशासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आली.

# विकसित महाराष्ट्रासाठी भाजप कार्यकर्त्यांनी क्रियाशील व्हावे : रविंद्र चव्हाण

पुणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांने अधिकाधिक वेळ पक्षकार्यासाठी देऊन क्रियाशील राहावे, असे आवाहन भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले.

पुण्यात गणेश कला क्रीडा मंडळ येथे सोमवारी झालेल्या भाजपा प्रदेश



कार्यकारिणी बैठकीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्य मंत्रिमंडळातील भाजपाचे मंत्री, प्रदेश पदाधिकारी, ज्येष्ठ नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजपाने राज्यभर कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण शिबिरे घेतली असून, केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी नव्या वक्त्यांची फळी तयार करण्याचे काम सुरू असल्याचे चव्हाण यांनी सांगितले. राज्यातील १ लाख ५६ हजार बूथवर कार्यकर्ते सक्रिय करून प्रत्येकाला जबाबदारी देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

युवकांना व्यसनमुक्त करण्यासाठीही पक्ष कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. दीपप्रज्वलनानंतर पुणे जिल्हाध्यक्ष धीरज घाटे यांनी स्वागत केले, तर प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी प्रास्ताविक केले.

## देशातील पहिला अंतराळ संशोधन मेळावा महाराष्ट्रात

मुंबई(रमेश औताडे) : महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने भारतातील पहिल्या भव्य अंतराळ संशोधन मेळावाची घोषणा उद्योग मंत्री उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांनी केली. हा मेळावा अंतराळ, विज्ञान आणि सायन्स-फिक्शन वर आधारित असणार आहे. असे सामंत यांनी सांगितले.

मुंबईतील नेहरू सायन्स सेंटर येथे हा कार्यक्रम आयोजित केला जाईल. अंतराळ क्षेत्रातील ज्ञान, नवकल्पना, गेमिंग आणि मनोरंजन यांना एकाच व्यासपीठावर आणून महाराष्ट्रातील स्पेस-टेक स्टार्टअप्सना जागतिक गुंतवणूकदार व तज्ज्ञांशी जोडणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.असे न नोडविण गेमिंग चे संस्थापक अक्षत राठी यांनी सांगितले.

जागतिक तज्ज्ञांची चर्चासत्रे, सायन्स-फिक्शन गेमिंग झोन, स्पेस तंत्रज्ञान प्रदर्शन आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष शाळा-कॉलेज उपक्रम आयोजित केले जातील. असे आय ए एस डॉ. पी. अनबलगन, आय ए एस दीपेंद्रसिंग कुशवाह आणि प्रिमस पार्टनर्सच्या आरती हरभजंका उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या निश्चित तारखा लवकरच अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केल्या जातील.



मुंबईत प्रथमच कोकणातील शिमगा पालखी असलेला अँटॉप हिल चा इच्छापूर्ती गणेश

# मंगळागौर स्पर्धेतून संस्कृतीचा जागर अन् नारीशक्तीचा गौरव – महापौर सुजाता पाटील

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीच्या वतीने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त झालेल्या मंगळागौर स्पर्धेतून महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि नारीशक्तीचा जागर करण्यात आला.

महापौर सुजाता पाटील म्हणाल्या की, एकटी व्यक्ती आनंदी होऊ शकते; मात्र एकजुटीने आनंदासोबत परिवर्तनही घडविता येते. मंगळागौर स्पर्धा महिलांना एकत्र आणण्याचे प्रभावी माध्यम असून, सहभागी महिला संस्कृती जपणाऱ्या




दूत आहेत. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महापालिका विविध योजना राबवत असून, भविष्यात एनएमएमटी बसचे चालक म्हणून महिलांना संधी देण्यासाठी चारचाकी वाहन प्रशिक्षणाची योजना मंजूर करण्यात आली आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

आमदार मंदाताई म्हात्रे यांनी मंगळागौरीच्या माध्यमातून संस्कृतीचे जतन होत असल्याचे सांगितले. सभागृह नेते सागर नाईक यांनी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महापालिका कटिबद्ध असल्याचे नमूद केले.

स्पर्धेत रुचिरा ग्रुप, ऐरोली यांनी प्रथम, नारीशक्ती मंगळागौर समूह, नेरूळ यांनी द्वितीय, तर वाशीचा राजा महिला बचत गट यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. ३२ महिला समूहांनी सहभाग घेतलेल्या स्पर्धेच्या अंतिम फेरीत १० समूहांची निवड झाली. यावेळी ६५ महिला बचत गट व मंडळांचे उत्पादन विक्री स्टॉल्सही लावण्यात आले.

## बँगलोर येथील "निखिल प्रॉडक्ट्स" चे गार्डन ऑफ ईडन आणि अंबर उद हे उत्कृष्ट दर्जाचे धूप बाजारात !

मुंबई : निखिल प्रॉडक्ट्स बैंगलोरच्या कंपनीने येणाऱ्या सण उत्सवासाठी श्रावण, गणपती, दसरा, दिवाळी या सणांचे औचित्य साधून गार्डन ऑफ ईडन आणि अंबर उद हे उत्कृष्ट दर्जाचे धूप बाजारामध्ये उपलब्ध केले आहेत.

पूजा किंवा धार्मिक विधीमध्ये धूपाला विशेष महत्व दिले गेले आहे. असे मानले जाते की देवाची पूजा करत असताना आपले मन संपूर्णपणे प्रार्थनेत विलिन व्हावे, यासाठी धूपाच्या मनमोहक सुवासाची मदत होते.

गार्डन ऑफ ईडन आणि अंबर उद धूप हे धूप उच्च दर्जाच्या नैसर्गिक सुगंधी द्रव्यापासून तयार केले असून, १० कांड्यांच्या पॅकिंगमध्ये आणि MRP १२५/- सह बाजारात उपलब्ध आहेत.

हे दोन्ही धूप मुंबई, ठाणे, कोकण, पुणे, कोल्हापूर, नाशिक, बीड सह संपूर्ण महाराष्ट्रात उपलब्ध आहेत.

**निखिल प्रॉडक्ट्स च्या उत्पादनांचे मुंबईचे प्रमुख विक्रेते चार्य प्रॉडक्ट्स यांच्या शाखा :**

(१) शॉप नं.५-८, संगीत सागर, एल.एन. लेन, माटुंगा (पु.), मुंबई-१९. (संपर्क ८६५५७६६७७८)
शॉप नं.३, श्रीपती आराधना टॉवर, राममंदिरच्या पुढे, भुलेश्वर, मुंबई-२. (संपर्क ९७६९०७८३६५)
(२) (३) शॉप नं.१९-ए, नटराज मार्केट, स्टेशन रोड, मालाड (प.), मुंबई-६४. (संपर्क ७५०६८१६२७२)
(४) शॉप ३-४ हॉटेल प्रिन्स, अशोक टॉकीज शेजारी, स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम) -४००६०१. (संपर्क ९९६७६५८७६८)
(५) शॉप नं.१, मर्चेट सेंटर, ए.पी.एम.सी. मार्केट, सेक्टर १९, वाशी-४००७०३. (संपर्क ८८७९३७४५९२) संपर्क साधावा.

## तानाजी घाग यांची शिवसेना आनंद यात्री पर्यावरण सेना अध्यक्षपदी नियुक्ती

मुंबई : शिवसेना पक्षाच्या आनंद यात्री पर्यावरण सेना अध्यक्ष (महाराष्ट्र राज्य)पदी श्री. तानाजी लक्ष्मण घाग यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आल्याचे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे.

वंदनीय हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि शिवसेना पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली तानाजी घाग यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सदर नियुक्ती शिवसेना पक्षांतर्गत निवडणुका होईपर्यंत राहणार असल्याचेही पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे.

बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार तसेच धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण यांचा सक्रियपणे प्रचार व प्रसार करावा, तसेच शिवसेना पक्षाच्या वाढीसाठी सर्वांना सोबत घेऊन कार्य करावे, अशी अपेक्षा नियुक्तीपत्रातून व्यक्त



करण्यात आली आहे.

दरम्यान, नियुक्तीची जबाबदारी स्वीकारल्यानंतर दर महिन्याला केलेल्या कार्याचा लेखी अहवाल बाळासाहेब भवन कार्यालयात सादर करणे बंधनकारक असल्याची सूचना देण्यात आली आहे.

तानाजी घाग यांच्या नियुक्तीबद्दल शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, पर्यावरण संवर्धनासह संघटनात्मक कार्याला त्यांच्या माध्यमातून अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

Printed and published by Bhimrao Hindurao Dhulap, Printed at Plaskot Industries, 23, Municipal Indl. Estate, K. K. Marg, Satrasta, Mumbai -400 011 and published at C/66, Mukuda Nagar, A-Ward, Laxmi Mandir, Dharavi, Mumbai - 400 017. Editor : Bhimrao Hindurao Dhulap, Mob. 9221117684
Any litigation against the content will be entertained under the jurisdiction of Mumbai only.
हे साप्ताहिक प्रकाशक, मुद्रक, मालक श्री. भिमराव हिंदुराव धुळप यांनी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीयल इस्टेट, के. के. मार्ग, सातरस्ता, मुंबई -४०० ०११ येथून छापून सी/ ६६ मुकुंदनगर, ए/ वॉर्ड, लक्ष्मी मंदिर, धारावी, मुंबई - ४०० ०१७ येथून प्रकाशित केले. संपादक : भिमराव हिंदुराव धुळप. मो. ९२२१११७६८४
(प्रकाशित बातम्या / लेखांशी सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद मुंबई न्यायकक्षेत)